| **Publication** – Sakal | **Page No** - 05 |
|---|---|

# रबर उद्योगाची उलाढाल पाच बिलियन डॉलर

## मुंबईमध्ये जानेवारीत आशियातील सर्वांत मोठे प्रदर्शन

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ९ : देशातील साडेपाच हजार रबर उद्योगांची पाच बिलियन यूएस डॉलर इतकी उलाढाल आहे. टायरविना उद्योगात ४० टक्के म्हणजेच २० हजार कोटींच्या रबर उत्पादनांचा उपयोग केला जातो. टायर उद्योगासाठी पाच टक्के उत्पादने वापरली जातात. या उद्योगाची वृद्धी ८ टक्के आहे. अशा या रोजगारनिर्मितीची जबरदस्त क्षमता असलेल्या रबरचे जानेवारी-२०१९ मध्ये आशियातील सर्वांत मोठे प्रदर्शन मुंबईत होत आहे.

ऑल इंडिया रबर इंडस्ट्रीज असोसिएशनतर्फे २००१ पासून रबर प्रदर्शनाची सुरवात झाली. भारतीय रबर उद्योगाचे संरक्षण करणे आणि त्याला प्रोत्साहन देणे, या उद्देशाने १९४५ मध्ये संघटनेची स्थापना झाली. भारतीय कंपन्यांना आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रतिनिधींशी सहयोग करण्यासाठी प्रदर्शनाच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. गोरेगावमध्ये होणाऱ्या प्रदर्शनाबद्दल जनजागृती होण्यासाठी अहमदाबादपासून रोड शोला सुरवात करण्यात आली. देशातील १५ शहरांत रोड शो होईल. त्याअंतर्गत नाशिकचा समावेश आहे.

हॉटेल एक्स्प्रेस इनमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत रबर प्रदर्शनाचे मुख्य समन्वयक विष्णू भीमराजका यांनी याबाबतची माहिती दिली. वरिष्ठ उपाध्यक्ष विक्रम मकार, पुण्याचे विनोद बन्सल, विनोद पटकवार, मुंबईचे उमेश ध्रुव, नाशिकचे एस. जी. पटेल आदी उपस्थित होते.

### २८ टक्क्यांनी वाढले भागभांडवल

**जीएसटी हा रबर उद्योगातील निर्यातदारांसाठी खूपच फायदेशीर आहे, पण जीएसटी लागू झाल्यापासून परतावा वेळेत मिळत नाही. त्यामुळे २८ टक्क्यांनी भागभांडवलात वाढ झाली आहे. एवढ्या मोठ्या खर्चाची जुळणी करावी लागत असल्याने उलाढालीचे उद्दिष्ट साध्य करणे मुश्कील बनले आहे, अशी प्रतिक्रिया श्री. ध्रुव, मकार, श्री. बन्सल यांनी व्यक्त केली.**

### सव्वीस हजार चौरसमीटर क्षेत्रफळ

संघटनेतर्फे २००१ मध्ये तीन हजार चौरसमीटर क्षेत्रफळामध्ये पहिले प्रदर्शन भरविले होते. आताच्या दहाव्या प्रदर्शनासाठी २६ हजार चौरसमीटर क्षेत्रफळाची जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यात आंतरराष्ट्रीय परिषदेचा समावेश असेल. याशिवाय कार्यशाळा घेण्यात येईल. आंतरराष्ट्रीय शंभर कंपन्यांच्या प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात येणार आहे.